# <u>प्रेसनोट दि. ३१/०५/२०१९</u>

## पुणे शहरातील भिक्षेकरी यांचेवर सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडुन धडक कारवाई.

मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी "भिक्षेकरी मुक्त पुणे शहर" ही संकल्पना राबविण्याचे निश्चित केले असुन मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे प्रेरणेमधुन पुणे शहरातील चौकामध्ये भिक्षा मागणारे भिक्षेकरी यांचेवर कारवाई होणे करीता वाहतुक शाखेच्या कर्मचारी यांचेकडुन माहिती घेवुन दिनांक ३०/५/२०१९ रोजी तसेच दिनांक ३१/५/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभागामार्फत शिवाजीनगर, लष्कर, रास्तापेठ, बंडगार्डन परिसरामध्ये मोहिम राबवुन <u>१७ अल्पवयीन मुलांना</u> भिक्षा मागत असताना ताब्यात घेवुन त्यांना भिक्षा मागणेस भाग पाडणारे <u>२७ स्त्री पुरुष</u> यांचेवर जेजे ॲक्ट २०१५ चे कलम ७६ प्रमाणे खटले दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

पुणे शहरामध्ये भिक्षा मागणारे लोकांचेवर आळा बसुन भिक्षेकरी मुक्त पुणे शहर ही संकल्पना राबविण्याचे उध्देशाने सामाजिक सुरक्षा विभागा मार्फत या पुढे सुध्दा अशाच प्रकारच्या मोहिमा राबवुन कारवाई करण्यात येणार आहे. नागरीकांनी भिक्षेकरी यांना भिक्षा न देता भिक्षा मागणारे लोकांचे बाबतची माहिती नियंत्रण कक्षास देणे बाबत पुणे शहर पोलीसांचे कडुन आवाहन केले आहे. नमुद कारवाई पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे व सामाजिक सुरक्षा विभागातील कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned by CamScanner